महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

वर्ष : – १ ले अंक :– ०२ मंगळवार दि. ५ नोव्हेंबर २०२४ पान :– ४ किंमत ५ रु. जळगाव

# पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली ; कार्यभार फणसळकर यांच्याकडे

**कोण होणार पूर्णवेळ डीजी?**



विवेक फणसळकर | संजय कुमार वर्मा | सदानंद दाते

**वरील ३ अधिकाऱ्यांशिवाय रितेश कुमार, अमिताभ गुप्ता, संजीव कुमार सिंघल यांचीही नावे चर्चेत.**

मुंबई : राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची निवडणूक आयोगाने बदली केल्यानंतर मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला आहे. रिक्त महासंचालक पदासाठी फणसळकर यांच्यापाठोपाठ संजय कुमार वर्मा, सदानंद दाते आणि रितेश कुमार यांच्या नावाचीही चर्चा आहे.



पोलिस महासंचालक रजनीश सेठ हे ३१ डिसेंबरला सेवानिवृत्त झाले. सेठ यांच्यानंतर राज्य सरकारने पोलिस महासंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे सोपविला होता. मात्र, ४ जानेवारी रोजी महासंचालक म्हणून फोन टॅपिंगच्या आरोपांतून मुक्त झालेल्या शुक्ला यांच्या नियुक्तीचे आदेश जारी झाले.

**विरोधकांचे आरोप**

निवडणुकीच्या काळात शुक्ला यांना पदावरून हटवावे, अशी मागणी विरोधकांकडून केली जात होती. विरोधकांनी केंद्रीय निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेत शुक्ला यांच्या कार्यकाळात निष्पक्ष निवडणूक पार पडणार नाही, असा आरोप केला. त्यानंतर आयोगाने सोमवारी शुक्ला यांची बदली केली.

**बदली फक्त निवडणुकीपुरती?**

■ शुक्ला यांची फक्त निवडणूक काळापर्यंत बदली करण्यात आली असून, निवडणुकीनंतर पुन्हा त्यांच्याकडे पदभार सोपविण्यात येणार असल्याचे समजते आहे. ■ नवीन डीजी हे फक्त निवडणूक काळापुरतेच मर्यादित असतील, अशीही चर्चा मुख्यालयात सुरु आहे.

**बिपिन कुमार सिंग यांच्या नावाची चर्चा अन् ब्रेक**

१९९० च्या बॅचचे महासंचालक बिपिन कुमार सिंग यांच्या नावाचीही सकाळपासून चर्चा होती. त्यांच्या कार्यालयीन माहितीत १९६५ चा जन्माची नोंद असल्यामुळे त्यानुसार, पुढच्या वर्षी ऑक्टोबर मध्ये निवृत्त होणार होते.
मूळ जन्मतारीख १९६४ ची दिवसांपूर्वीच निवृत्त झाल्याचे समजले. ज्येष्ठतेनुसार त्यांच्या नावाची चर्चा होती. मात्र ते तीन दिवसांपूर्वी निवृत्त झाले असून तारखा मधील गोंधळामुळे नावाचा उल्लेख झाल्याचे त्यांनी बोलतांना सांगितले.

१९८८ बॅचच्या शुक्ला ३० जूनला सेवानिवृत्त झाल्या होत्या; पण त्यांना ३ जानेवारी २०२६ पर्यंत पदावर ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.

## जळगाव जिल्ह्यातील अकरा मतदार संघासाठी
## १३९ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात

*** सर्वाधिक २९ उमेदवार जळगाव शहर मतदार संघात तर सर्वात कमी प्रत्येकी ८ उमेदवार चाळीसगांव मतदार संघात * जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीच्या रिंगणातून ९२ उमेदवारांची माघार**




जळगाव, (मीडिया सेंटर) दि. ४ – विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ करीता जिल्ह्यात नामनिर्देशनपत्र दाखल केलेल्या २३१ उमेदवारीपैकी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या आजच्या दि.४ नोव्हेंबर शेवटच्या दिवशी जिल्ह्यातील ९२ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे आता जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदार मतदार संघासाठी एकूण १३९ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात राहिले आहेत. अशी माहिती निवडणूक शाखेमार्फत प्राप्त झाली आहे.

विधानसभा मतदार संघनिहाय निवडणूकीच्या रिंगणातील उमेदवारांची संख्या (कंसात माघार घेतलेल्य उमेदवारांची संख्या)


चोपडा–९ (७) रावेर–९ (१४), भुसावळ–९ (७) जळगाव शहर–२९ (८) जळगाव ग्रामीण–११ (६) अमळनेर–१२(४), एरंडोल–१३ (०७) ,चाळीसगाव–८ (८) पाचोरा–१२ (१२) जामनेर–१०(१२)मुक्ताईनगर–७ (१७)याप्रमाणे आहे.

सोमवार दि.४ नोव्हेंबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत जिल्ह्यातील एकूण ११ विधानसभा मतदार संघात २३१ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते . दरम्यान मघारीच्या अंतिम दिवशी एकूण ९२ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आता जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदार संघात १३९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत

## मनोज जरांगेंना कोण मॅनेज करतंय?
### लक्ष्मण हाकेंनी केला खुलासा, म्हणाले 'रात्रीच्या वेळी त्यांना...'

मुंबई– मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी मोठा निर्णय घेतला असून विधानसभा निवडणूक लढणार असल्याचं जाहीर केलं आहे. मनोज जरांगे यांनी ज्या मतदारसंघातून उमेदवार देणार आहे त्यांची यादी जाहीर केली असून, कुठे उमेदवार पाडणार तेदेखील सांगितलं आहे. यानंतर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांच्यावर गंभीर आरोप केले असून महाविकास आघाडी त्यांना मॅनेज करत असल्याचा आरोप केला आहे. तसंच त्यांचे उमेदवार तकलादू असतील असं म्हटलं आहे. जर अशा प्रवृत्तीची माणसं निवडून आली तर २०२४ नंतर महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षण संपलेलं असेल असाही आरोप त्यांनी केला आहे.

जरांगे पाटील जे उमेदवार देणार आहेत, तेथील उमेदवार त्यांना येऊन भेटलले आहेत. म्हणून त्या मतदारसंघांची नावं घेऊन मोकळे झाले आहेत. मला वाटतं तिथंदेखील उमेदवार मिळणार नाहीत. मिळाले तर एकदम तकलादू असतील. कोणाला तरी पाडण्यासाठी,



कोणाला तरी निवडून आणण्यासाठी बारामतीच्या सांगण्यावरुन उमेदवार दिले असतील. त्यांच्या या उमेदवारांमध्ये काही ताकद नाही, अशी टीका लक्ष्मण हाके यांनी केली आहे. जरांगे कोणाला मॅनेज झाले आहेत? असं विचारलं असता त्यांनी म्हटलं की, जरांगे बारामतीला मॅनेज आहेत. लोकसभेत महाविकास आघाडीसाठी त्यांनी काम केलं आहे. ओबीसीच्या नेतृत्वाला पाडलं आहे. ओबीसीच्या माणसांना टार्गेट करुन यांच्या सात पिढ्या राजकारणात पराभूत करा असं जरांगे म्हणाल्याचं सर्वांनी पाहिलं आहे. जरांगे हे तुतारीची सुपारी घेऊन काम करत आहेत. जर अशा प्रवृत्तीची माणसं निवडून आली तर २०२४ नंतर महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षण संपलेलं असेल अशी भितीही त्यांनी बोलून दाखवली आहे. जी माणसं भेटली त्यांच्या विरोधात ते उमेदवार देणार नाहीत असा आरोपही त्यांनी केला.

यावर त्यांना प्रसारमाध्यमांनी हसन मुश्रीफ, राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत या महायुतीच्या नेत्यांनीही भेट घेतल्याचं सागंण्यात आलं. त्यावर ते म्हणाले की, आम्ही कोणत्याही उमेदवाराल सोडत नाही आहोत. महाविकास आघाडी असो किंवा महायुती, प्रहार मग कोणत्या आघाडीचा असो. आम्ही कोणत्याही पक्षाची बाजू घेत नाही आहोत. ज्यांनी ओबीसीच्या बाबतीत विरोधात भूमिका घेतली, जरांगेच्या बेकायदा मागण्यांना पाठिंबा दिला त्यांना ओबीसी मतदान करणार नाही.

आमचं टार्गेच महाविकास आघाडीच आहे, कारण त्यांच्या सर्वोच्च नेत्यांनी जरांगेंना पाळलंय, पोसलंय, प्रमोट केलं आहे. आम्ही त्यांना का टार्गेट करु नये. आमच्याकडे सर्व पुरावे आहेत, असा दावाही त्यांनी केला.



## उत्तराखंडमध्ये बस दरीत कोसळली; ३६ ठार

अल्मोडा :– उत्तराखंडमधील अल्मोडा येथे भीषण अपघात झाला आहे. या बसमध्ये ४० हून अधिक लोक प्रवास करत होते. त्यातील २३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर १५ जण जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

ही बस गढवालहून कुमाऊंकडे जात असताना अल्मोडा येथील मर्कुलामध्ये हा अपघात झाला. बसमध्ये सुमारे ४० प्रवासी होते, त्यामुळे मृतांचा आकडा वाढू शकतो. शोध आणि बचाव कार्य सुरू करण्यासाठी पोलीस आणि एसडीआरएफचे जवान घटनास्थळी पोहोचले आहेत.

मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या अपघातावर शोक व्यक्त केला आहे. त्यांनी द वर लिहिले की, अल्मोडा जिल्ह्यातील मर्चुला येथे झालेल्या दुर्दैवी बस अपघातातील मृतांची अत्यंत दुः खद बातमी मिळाली. याप्रकरणी जिल्हा प्रशासनाला तातडीने मदत आणि बचाव कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. घटनास्थळी स्थानिक प्रशासन आणि डख्ठ्रक्र टीम जखमींना बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना उपचारासाठी जवळच्या आरोग्य केंद्रात नेण्याचे काम त्वरीत करत आहेत.'

## राजकारणातील भाषा घसरली, पक्ष कोणताही असू द्या;सर्वांपेक्षा महाराष्ट्र मोठा आहे: सध्याच्या राजकारणावर राज ठाकरेंचे मोठे वक्तव्य

ठाणे : राजकीय पक्ष कोणताही असू देत या सर्वांपेक्षा महाराष्ट्र मोठा आहे याचे राजकारण्यांनी भान ठेवलं पाहिजे सध्या स्थितीला राजकारणातील भाषा घसरली असून गेल्या पाच वर्षात महाराष्ट्राची ही अवस्था आहे, पुढच्या दहा वर्षांची काय असेल. राजकारणाची भाषा बदलली, कोणीही उठून टीव्हीवर शिव्या देत आहेत. असे राजकारण असेल तर भविष्यातील पिढ्यांनी काय करायचे, अशा प्रकारच्या व्यभिचार करणाऱ्यांना तुम्ही वठणीवर आणणार नसाल तर महाराष्ट्राला परमेश्वरच वाचवू शकतो. मनसे, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस अथवा अजून कोणताही पक्ष असू दे, या सर्वांपेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. पक्ष मेले तरी चालतील, महाराष्ट्र जगला पाहिजे, असे राज्यातील राजकीय स्थितीवरुन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ठाण्यातील जाहीर सभेत प्रतिपादन केले आहे. मनसेच्या अविनाश जाधव (ठाणे शहर), संदीप पाचंगे (ओवळा – माजिवडा), संदीप राणे (मीरा – भाईंदर) आणि सुशांत सूर्यराव (मुंब्रा – कळवा) या विधानसभा मतदारसंघांच्या उमेदवारांसाठी ब्रह्मांड चौकात झालेल्या सभेतून ठाकरे यांनी सर्व राजकीय पक्षांवर तोफ डागली आहे. पूर्वी ठाणे शहर छान, टुमदार होते. तलावांचे शहर अशी ठाण्याची ओळख होती. मात्र विकासकांच्या घशात घालून या शहराचे वाटोळे करण्यात आले, अशी टीका या सभेतून राज ठाकरे यांनी केली. शहरातील तलाव बुजवून तिकडे सोसायट्या आणि कॉलनी उभ्या करण्यात आल्या. आता याठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जातो. या तलावांमध्ये अनेकांना पोहताना मी पाहिले आहे, आता हे तलाव बुजवून उभ्या राहिलेल्या सोसायट्यांमधील तरण तलावात



टँकरने पाणी भरले जाते. शहर कशी मोठी करावी, याबाबत दृष्टी नसल्याने सर्व बजबजपुरी झाली, असे टीकास्त्र ठाकरेंनी येथील सत्ताधाऱ्यांवर सोडले. दरम्यान, ठाणे जिल्ह्यातील शहरांवर येणारा नागरीकरणाचा ताण, पहाटेचा शपथविधी, पक्ष फोडाफोडीचे राजकारण, या मुद्द्यांचाही ठाकरे यांनी डोंबिवलीतील सभेप्रमाणेच ठाण्यातही समाचार घेतला. याप्रसंगी मनसेमधील पूर्वीचे पदाधिकारी डी. सी. पाटील यांनी पुन्हा एकदा ठाकरे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला.

अभिनेते शरद पोंक्षे मंचावर मनसेच्या या मंचावर ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उपनेते असलेल्या पोंक्षे यांनी ठाकरे यांचे भाषणाआधी उपस्थितांना संबोधित केले. सध्याच्या राजकीय स्थितीवर पोंक्षे यांनी परखड मत मांडले. मी शिवसेनेचा नावाचा उपनेता असून अद्याप त्याच पक्षात असल्याचेही ते म्हणाले. पोंक्षे यांनी कोणतेही 'पक्षांतर' न करता मनसे उमेदवारांना निवडून आणण्यासाठी आवाहन केले, याबाबत मी त्यांचे आभार मानतो, असे याप्रसंगी राज ठाकरे म्हणाले. यासोबतच स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या नात आसिलेता राजे – सावरकर या देखील मनसेच्या व्यासपीठावर उपस्थित होत्या. ठाकरे यांनी त्यांचे स्वागत केले. तसेच त्या लवकरच पक्षाच्या कामाला लागणार असल्याचे ठाकरे यांनी सांगितले.

## दोन पंचवार्षिक निवडणुकीत मतदारांनी केला नोटाचा वापर

**जिल्ह्यात १ हजार ७५६ केंद्रांवर मतदार करतील मतदान**

धुळे–जिल्ह्यात पाचही विधानसभा मतदारसंघात एकूण १ हजार ७५६ मतदान केंद्रावर मतदान करण्यात येणार आहे. यापैकी शहरी भागात ४७८ तर ग्रामीण भागात एक हजार २७५ मतदान केंद्र राहणार आहे.

साक्री विधानसभा मतदारसंघात ४०२ मतदान केंद्र आहेत. तर धुळे ग्रामीण ३८८, धुळे शहर २८८, शिंदखेडा ३३८ तर शिरपूर तालुक्यात ३३६ मतदान केंद्र आहेत. या सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी अवश्य त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्यची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील एकूण मतदारांमध्ये ९ लाख ३१ हजार ३४१ पुरुष, ८ लाख ८७ हजार ७४४ महिला, तर ५० तृतीयपंथी मतदार असे एकूण १८ लाख १९ हजार १३५ मतदार आहेत. यामध्ये १८ ते १९ वर्षे वयोगटातील एकूण ४१ हजार ५२६ मतदार आहेत. २० ते २९ या वयोगटातील एकूण ३ लाख ७८ हजार ८११ मतदार, ३० ते ३९ या वयोगटातील एकूण ३ लाख ९४ हजार ४६४ मतदार आहेत.

४० ते ४९ या वयोगटातील एकूण ४ लाख ५ हजार ६०५ मतदार तर ५० ते ५९ या वयोगटातील एकूण २ लाख ७७ हजार ४५६ मतदार आहेत. ६० ते ६९ या वयोगटातील एकूण १ लाख ८२ हजार ६७९ मतदार, ७० ते ७९ या वयोगटातील एकूण ९५ हजार ६२ मतदार आहेत. जिल्ह्यात ८० ते ८४ या वयोगटातील एकूण २२ हजार ७४० मतदार, तर ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या २० हजार ७९२ इतकी आहे. हे सर्व मतदार २० नोव्हेंबर रोजी आपल्या मतदानाचा हक्क बजाविणार आहेत.

एकूण मतदारांमध्ये ११ हजार ५०८ दिव्यांग मतदार, तृतीयपंथी मतदारांची संख्या ५० इतकी आहे, तर सेवा दलातील (सर्व्हिस व्होटर्स) २ हजार ४९० मतदार आहेत. जिल्ह्यातील दिव्यांग मतदारांना घरुन मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच मतदान केंद्रावर सुद्धा त्यांना मतदानासाठी केंद्रापर्यंत पोहचण्यासाठी आवश्यक त्या सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली.

## संपादकीय

# निवडणूक!

निवडणूक आली की सर्व मतदाराच्या इच्छा ,अपेक्षा पल्लवीत होतात. प्रत्येकच मतदारांचा उत्साह वाढून आपण काही या निवडणुकीत विशेष वेगळे केल्याचा अंतर्भाव तो मनात जपत असतो. परंतु निवडणुक ही रंगीबेरंगी असते व मागील निवडणुकीत अंगावरचे काळे पडलेले डाग स्वच्छ करण्याची , ती प्रक्रिया असते. निसर्गाचा इंद्रधनुष्य सप्तरंगी आहे. तांबडा , जांभळा, निळा,पिवळा,लाल, हिरवा,केशरी, पांढरा , असा रंगीबेरंगी इंद्रधनुष्य पावसाच्या सरीत आकाशात शोभायमान दिसतो. तसेच लोकशाहीने मात्र हे सर्वच राजकीय रंग पचवून घेतलेत . मूळ घटनेचे जसे तुकडे केले, तसेच सत्ताधीशांनी, राजकीय पक्षांनी, व इतर सामाजिक संघटनांनी सुध्दा, नैसर्गिक इंद्रधनुष्यातील अनेक रंग वाटून घेतले. जसे शेतकरी संघटनेचा लाल रंग, बौद्ध समाजाचा निळा, मुस्लिमांचा हिरवा, मातंग समाजाचा पिवळा. हिंदूचा भगवा, तसेच राजकीय पक्षाने सुद्धा - भारत राष्ट्र समितीचा गुलाबी. आर.पी. आय चा निळा, शिवसेनेचा भगवा, कम्युनिस्टनचा लाल, लोकसंग्राम पक्षाचा लाल - काळा, राजकीय पक्षांचे रंगावर सुद्धा शिक्का मोर्तब झाले. म्हणजेच हे पक्ष एकत्र नांदायला तयार नाहीत. जिकडे तिकडे राजकीय पक्षाच्या दुकानदारीचा बाजार मांडला गेला, म्हणजेच समाजात दुही,भांडणे लावणारे खरे हेच दोषी असून शकुनी मामा आहेत. व हे सर्व स्वार्थासाठी एकत्र येतात अन् मतलब संपला की दूर जातात.

इंद्रधनुश्यातील रंगाप्रमाणे सारेपक्ष एकत्र येऊन. सन २६ जानेवारी १९५० मध्ये लागू झालेली मूळराज्य घटना पुन्हा समाजात कार्यरत झाली. तर आपणहून लोकशाही नांदेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या मूळ राज्य घटनेचा रंग हा सत्तेत आलेल्या पक्षांनी बेरंग करून टाकला. प्रत्येका नी वेळोवेळी आप -आपल्या सोयीनुसार राज्य घटना दुरुस्ती केल्यामुळे देशावर ही कर्जबाजारीपणाची अवदशा आणून ठेवली. आज दर डोई चाळीस हजार रुपये कर्ज, देशाची आर्थिक धोरणे बिघडल्यामुळे झाली. त्याचे बसणारे चटके नागरिकांनाच आता सहन करावे लागत आहे . हे सर्व रंगी बेरंगी पक्षाचे मालक, तिजोरीवरील नागोबा होऊन बसलेत, जनतेच्या कष्टाची तिजोरी लुटण्याचे दिवा स्वप्न पाहत आहे. आपल्या आहारावर कितीक हिस्सा येईल. हीच मतलबी चिंता यांना सतावत आहे. ना कोणाला शिवाजीचे राज्य आणायचे आहे? ना कोणाला शेतकरी,शेतमजुराचे आर्थिक स्वातंत्र्य आणायचे आहे? .

जबरदस्तीने सत्ता टिकवायची, अन् कायद्यांची चिरफाड करून , सत्तेच्या बळावर न्यायालये झुकवायची, अशी भाषा जर कोणी करीत असेल तर आता न्याय मागायचा कुठे? कारण आज खोट्या कामाचे सादरीकरण करून, आपल्या बाजूने निकाल लावण्यातच बकाळ पैसा मिळतो. म्हणतात ना जेव्हा जनतेचा राग अनावर होईल, तेव्हा सुप्रीम कोर्ट सुध्दा जनता जाळून टाकायला मागे पुढे पाहणार नाही? ही भविष्याची नांदीच जनतेला आता दिसत आहे. हीच परिस्थिती लोकशाहीला घातक आहे.या आमदार - खासदारांनी लालची पोटी या देशाची वाट लावली. हे सारे भाड्याचे बैल आहेत. म्हणजेच निराशावादी बनवून फक्त शासकीय योजनांवर जगण्याच्या जनतेला सवयी लावल्यात? सर्वच पक्ष,सर्वच जातीचे, नात्यागोत्यातील आमदार- खासदार बदलवून पहिले, पण रस्ता दिसला नाही. कारण या सर्वाचे मूळ खांडूक वारंवार केलेली घटना दुरुस्ती आहे. त्यामुळेच लोकशाहीतील वाटचाल ही हुकूमशाहीकडे नेल्या गेली. त्यासाठी संसद मध्ये पुन्हा आता नवीन धोरणाची कायदे दुरुस्ती करावी लागेल. परिवर्तन हाच निसर्गाचा नियम आहे. तरच लोकशाही टिकेल.

काही जुनी व्यवस्था कालबाह्य झाली. तर पुन्हा पुढील पिढीसाठी नवीन प्रोत्साहित व्यवस्था उभी करावी लागेल. देश तर भिकरचोट व्यवस्थेत आणून ठेवला. शेतीमालाचे भाव कमी देवून ,सरकारी स्वस्त दुकानात धान्य वाटप फुकट वाटप चालू आहे. भारत हा कृषी व ऋषीची परंपरा असलेला देश आहे. मूळ संस्कृतीला बगल देवून लूच्चेशाहीला जिवंत ठेवण्याचे नाटक चालू झाले आहे. नुसते स्टेज वर जाऊन, एकमेकाची खरडपट्टी काढणे, एकमेकांचे गटारे उधळणे, शिव्यादेवून टाळ्या घेणे,असाच तमासखोरांचा तमाशा चालू आहे. नुसते दिवसभर टीव्ही, चॅनल , इलेक्ट्रॉनिक मीडिया, बरबटलेल्या परिस्थितीचे दर्शन घडवीत आहे. सर्वच पक्ष भ्रष्टाचारी आहेत. कोणीही धुतल्या तांदळाचे नाहीत. एकेकाळी काँग्रेस भ्रष्टाचारी होती आता बीजेपी सुद्धा भ्रष्टाचारी झाली . आणि पुन्हा सत्ता बदल झाला तर बीजेपीचा भ्रष्टाचार सुद्धा बाहेर आल्याशिवाय राहणार नाही, याची बीजेपीला सुद्धा आता भीती आहे . भ्रष्टाचार संपवायला निघाले होते,जे बाहेर गेलेला भ्रष्टाचारी पैसा आणायला गेले होते , तेच आता स्वतःच भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण द्यायला निघाले?

अगोदर सन१९९० चे काळात कर्तबगारीवर, नितीमत्तेवर, संस्कारी पक्षाचे ध्येय धोरणावर, मतदार मते देवून उमेदवारांना शिक्का मोर्तब करायचे. मात्र नंतरचे काळात त्यांनीच सरकारचे तिजोरीतला अर्थार्जनाचा सहारा घेतला.अन् समाजात महाचोराची किंमत वाढायला लागली,आणि तिथेच नीतिमत्ता संपली. शेतकरी - शेतमजूर वर्ग हा शासन योजनेचा लाभ घेण्यासाठी सत्तेतील आमदार- खासदारांच्या मागे धावू लागला . हेच तर स्वतःच लुटारु, धोकेबाज असून फक्त शेती उत्पादनाचे समर्थक आहेत, कारण शेती उत्पादनातून देश पोसल्या जातो. परंतु त्या शेतकरी- शेतमजुरांची परिस्थिती बदलविण्यासाठी शेतकऱ्यांचे आर्थिक धोरणे बदलविण्यासाठी, मात्र ते शेतकऱ्यांचे विरोधक आहेत . देशाचे आर्थिक धोरणे बहुताशी समाजाला कळत नाही, अन् त्यामुळेच रंगी बेरंगी झेंडे ऊतू आले. शेतकरी- शेतमजुराचे प्रश्न गेल्या ७५ वर्षात काँग्रेस - बीजेपी सोडू शकली नाही. म्हणून मतदारांनी अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देणे व निवडून आणणे चालू केले , परंतु याचा परिणाम असा झाला की, शेतकरी शेतमजुरांचे प्रश्न हे केंद्रातील असल्यामुळे आयात- निर्यात धोरणे शेतीमालाचे भाव, हे यांच्या कक्षेच्या बाहेर आहे. कोणताही अपक्ष आमदार हे प्रश्न सोडवू शकत नाही. त्याचाच गैरफायदा घेऊन अपक्ष आमदारांनी मतदानाचा व्यापार करणे सुरू झाले. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती विरोधी विधानपरिषद, मतदानाची गरज भासल्यामुळे,अपक्षांचा खजिना वाढणे सुरू झाला .

ज्या विश्वासाने जनतेनी अपक्ष आमदारांना मते दिली, ते शेतकरी- शेतमजुरांचे प्रश्न तर सोडवु शकलेच नाहीत. तर उलट अमरावती जिल्ह्यात या अपक्ष आमदारांचे पूर- महापूर येऊ लागले. एकेकाळी समाजसेवेचे व्रत घेऊन मोठमोठे ग्रामीण भागातील ऐश्वर्याचे वाडे जनतेच्या सेवेसाठी खलास झालेत , त्याच्याच उलट एकेकाळी साधारण परिस्थितीतील असलेले आमदार - खासदार आज करोडपती - अब्जोपती , मालगुजार झाले, तर ते जनतेच्या मतावर व शासनाच्या तिजोरीतील मलाई खाल्ल्यामुळे झाले, हे आता स्पष्ट झाले आहे. शेतकरी - शेतमजुराच्या नावावर प्रत्येक निवडणुकीत आवाज उठविणे,बोंबा ठोकणे ,मते जमा करणे व त्यातून स्वहित जपणे, एवढाच गोरख धंदा उरला. आता तर राजकीय पक्षावर सुद्धा विश्वास राहिला नाही. स्व. शरद जोशी यांच्या अ-राजकीय व्यवस्थेमुळे, शेतकरी शेतमुजरांमध्ये, जागृती झाली . परंतु आंदोलनातून परिपूर्ण प्रश्न सुटू शकले नाहीत. ते प्रश्न राजकीय स्वरूपात सोडविण्यासाठी, शेतकऱ्यांच्या आक्रोशाचा फायदा घेण्यासाठी अपक्षांनी धाव घेतली. शेतकरी प्रश्न आम्ही सत्तेतून सोडवतो हेच अर्धज्ञानी ओरड करू लागले. जेव्हा मतदार काँग्रेस- बीजेपीच्या विरोधी राहून अपक्ष उमेदवाराला मतदान करतो आणि तोच अपक्ष उमेदवार निवडून आल्यानंतर युती व आघाडीला पाठिंबा देतो.

# राज ठाकरे महायुतीचा खेळ बिघडवणार?; मुंबईतील २५ मतदारसंघ ठरणार गेमचेंजर

मुंबई: महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे (चरहरीरीहींर तळवहरप डरलहर एश्रशलींळेप २०२४) काऊंटडाऊन सुरू झाले आहे. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्यात थेट लढत होणार आहे. अशा परिस्थितीत मुंबईतील विधानसभेच्या ३६ जागा अत्यंत महत्त्वाच्या आहेत, कारण या ३६ जागांपैकी २५ जागांवर राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची भक्कम पकड आहे.

मनसेने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. मात्र विधानसभेच्या निवडणुकीत मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी 'एकला चलो रे'चा नारा दिला. मनसेचे राज्यात १५० हून अधिक विधानसभा मतदारसंघात उमेदवार उभे केले आहेत. यामध्ये मुंबईतील विधानसभेच्या ३६ पैकी २५ जागांवर मनसेने उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे मनसेने उमेदवार उभे केल्याने मुंबईत याचा फटका महायुतीला बसण्याची शक्यता आहे. मुंबईत भाजप १७ जागांवर तर शिवसेना १६ जागांवर निवडणूक लढवत आहे.




मनसेचे शिंदेंच्या विरोधात १२, तर भाजपविरोधात १० उमेदवार-

राज ठाकरे यांच्या पक्षाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिंदे गटाच्या विरोधात १२ आणि भाजपच्या विरोधात १० जागांवर उमेदवार उभे केले आहेत, तर महायुतीने शिवडी मतदारसंघातून आपला उमेदवार उभा केलेला नाही. शिवडी मतदारसंघातून मनसेचे ज्येष्ठ नेते बाळा नांदगावकर रिंगणात आहेत. याशिवाय मनसेचे अजित यांच्या गटाच्या विरोधात एक, तर आरपीआयच्या विरोधात एक उमेदवार उभा केला आहे.

मनसेला मराठी मते मिळाल्यास महायुती आणि महाविकास आघाडीला बसणार फटका-

मनसेने मुंबईतील वरळी, माहीम, मागठाणे, कुर्ला, चांदिवली, भांडुप आणि विक्रोळीसह इतर जागांवर उमेदवार उभे केले आहेत. या जागांवर मराठी माणसांची मते राज ठाकरे यांच्या पक्षाला गेली तर महायुती आणि महाविकास आघाडीचे मोठे नुकसान होऊ शकते.

मुंबईतील कोणत्या जागांवर महायुती आणि मनसेमध्ये टक्कर होणार?

कुलाबा-राहुल नार्वेकर (भाजप) - मनसेने उमेदवार दिला नाही.

मलबार हिल- मंगल प्रभात लोढा (भाजप)- मनसेने उमेदवार दिला नाही.

मुंबादेवी - शायना एनसी (शिंदे गट)

भायखळा- यामिनी जाधव (शिंदे गट)

वरळी- मिलिंद देवरा (शिंदे गट) - संदीप देशपांडे (मनसे)

शिवडी - बाळा नांदगावकर (मनसे) महायुतीकडून उमेदवार दिला नाही.

माहीम- सदा सरवणकर (शिंदे गट) - अमित ठाकरे (मनसे)

वडाळा- कालिदास कोळंबकर (भाजप)- स्नेहल जाधव (मनसे)

धारावी- राजेश खंडारे (शिंदे गट)- मनसेने उमेदवार दिला नाही.

कुर्ला- मंगेश कुडाळकर (शिंदे गट)- प्रदीप वाघमारे (मनसे)

वांद्रे पश्चिम- आशिष शेलाक (भाजप)- मनसेने उमेदवार दिला नाही.

वांद्रे पूर्व- झिशान सिद्दीकी (अजित पवार गट)- तृप्ती सावंत (मनसे)

चांदिवली- दिलीप लांडे (शिंदे गट)- महेंद्र भानुशाली (मनसे)

चेंबुर- तुकाराम काठे (शिंदे गट)- माऊली थोरवे (मनसे)

अणुशक्ती नगर- सना मलिक (अजित पवार गट)- मनसेने उमेदवार दिला नाही.

विलेपार्ले- पराग अळवणी (भाजप)- जुईली शेंडे (मनसे)

अंधेरी पश्चिम- अमित साटम (भाजप)- मनसेने उमेदवार दिला नाही.

वर्सोवा- भारती लव्हेकर (भाजप)- संदेश देसाई (मनसे)

गोरेगाव- विद्या ठाकूर (भाजप)- विरेंद्र जाधव (मनसे)

कांदिवली पूर्व- अतुल भातखळकर (भाजप)- महेश फारकसे (मनसे)

दिंडोशी- संजय निरुपम (शिंदे गट)- भास्कर परब (मनसे)

जोगेश्वरी पूर्व- मनीषा वायकर (शिंदे गट)-भालचंद्र अंबुरे (मनसे)

चारकोप- योगेश सागर (भाजप)- दिनेश साल्वी (मनसे)

मालाड पश्चिम- विनोद शेलार (भाजप)-मनसेने उमेदवार दिला नाही.

बोरीवली- संजय उपाध्याय (भाजप)- कुणाल मेनकर (मनसे)

दहिसर- मनीषा चौधरी (भाजप)- राजेश येरुणकर

मुलुंड- मिहीर कोटेचा (भाजप)- मनसेने उमेदवार दिला नाही.

भांडुप पश्चिम- अशोक पाटील (शिंदे गट)- शिरीष सावंत (मनसे)

विक्रोळी- सुवर्णा करंजे (शिंदे गट)- विश्वजीत दोलम (मनसे)

कलिना- अमरजीत सिंह (आरपीआय-भाजप)-संदीप हुटगी (मनसे)

मानखुर्द शिवाजी नगर- सुरेश पाटील (शिंदे गट)- जगदीश खांडेकर (मनसे)

घाटकोपर पश्चिम- राम कदम (भाजप)- गणेश चुक्कल (मनसे)

घाटकोपर पूर्व- पराग शाह (भाजप)-संदीप कुलथे (मनसे)

अंधेरी पूर्व- मुरजी पटेल (शिंदे गट)- मनसेने उमेदवार दिला नाही.

मागाठाणे- प्रकाश सुर्वे (शिंदे गट)- नयन कदम (मनसे)

सायन- तमिल सेलवन (भाजप)- मनसेने उमेदवार दिला नाही.

# जळगावात धाडसी चोरी ; लक्ष्मी पूजनासाठी देव्हाऱ्यात ठेवलेले १४ तोळे सोने-चांदीचे दागिने लंपास !

जळगाव (प्रतिनिधी) शहरातील गजानन कॉलनीत अज्ञात चोरट्याने भरदिवसा धाडसी चोरी केली आहे. देवघरात घुसून लक्ष्मी पुजनाचे वेळी ठेवलेले तब्बल १२ ते १३ लाखांचे १४ तोळे सोने-चांदीचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केल्यामुळे पोलिसांचा धाक संपलाय का?, असा प्रश्न उपस्थित होत आहे.शुक्रवारी रात्री ॲड. प्रतापराव निकम यांनी सहपरिवार लक्ष्मी पूजन करण्यासाठी घरातील सोने-चांदीचे दागिने देवघरात ठेवले होते. यानंतर शनिवारी सकाळी ते नेहमी प्रमाणे घरा खालील मंदिरात दर्शन घेण्यासाठी गेले. मुलगा खोलीत झोपलेला तर पत्नी घर कामात व्यस्थ होत्या. याच वेळी अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा तसेच वॉल कंपाउंडचे गेट उघडे असल्याचा फायदा घेत अवघ्या काही मिनिटात १२ ते १३ लाखांचे १४ तोळे दागिने घेत घरातून पळ काढण्याचा प्रयत्न केला. ॲड. प्रतापराव निकम याचवेळी नेमके घरात शिरले आणि त्यांनी चोरट्याला रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी दोघांमध्ये काही वेळ झटापटही झाली होती. परंतु चोरटा पळ काढण्यात यशस्वी ठरला.

चोरट्याने ६ तोळयाचे सोन्याचे ४ बांगडया, ३.५ तोळे वजनाचे लांब मंगळसुत्र, २ तोळे वजनाचे ६ अंगठया १ तोळे वजनाचे दोन मनगटया, दोन पाटल्या, एक जोड कानातले, ३ ग्रॅम वजनाचा १० हजार रुपये किंमतीची सोन्याचा तुकडा, ५ ग्रॅम चांदीचे जोडवे २० ग्रॅम वजनाचे चांदीचे पायातले पैंजण २ जोडी, असा ऐवज चोरट्याने लंपास केला आहे. दरम्यान, चोरटा सीसीटीव्हीत कैद झाला असून पोलिसांसमोर गुन्ह्याची उकल करण्याचे मोठे आव्हान आहे.

## रेल्वे मंत्रालयाचे शिक्के मारून तरुणाला दिली नोकरीची ऑर्डर !

### धरणगावात १३ लाखांत फसवणूक करणाऱ्या ७ जणांवर गुन्हा दाखल

धरणगाव (प्रतिनिधी) :- शहरीतील तरूणाला भारतीय रेल्वे खात्यात सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत बनावट कागदपत्रे तयार करून त्यावर रेल्वे मंत्रालय नावाचे खोटे शिक्के मारून वेळोवेळी १३ लाख रूपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी शनिवारी २ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजता धरणगाव पोलीस ठाण्यात ७ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.धरणगाव शहरातील मोहंमद जुबेर मोहंमद युसुफ (वय २७) हा तरूण आपल्या कुटुंबासह वास्तव्याला आहे. भारतीय रेल्वे खात्यात नोकरीला लावून देतो असे सांगून संशयित आरोपी सतिश गोकूळ पाटील, मनिषा सतिष पाटील, प्रमिला गोकुळ पाटील (सर्व रा. जुनोने, ता.अमळनेर), प्रविण गोकुळ महाले (रा.पारोळा), रामनारायण नेवाळकर,अरूण (पुर्ण नाव माहित नाही) (दोन्ही रा. नाशिक) आणि राजकुमार (पुर्ण नाव माहित नाही) (रा. दिल्ली) यांनी संगनमत करून मोहंमद जुबेर याला बनावट कागदपत्रे तयार करून त्यावर रेल्वे मंत्रालय नावाचे खोटे शिक्के मारून वेळोवेळी १३ लाख रूपये घेतले.त्यानंतर बनावट रेल्वेच्या नावाने ऑर्डरची प्रत देवून फसवणूक केली. दरम्यान आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर मोहम्मद जुबेर याने धरणगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार शनिवारी दि. २ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजता धरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहेकॉ सुधिर चौधरी हे करीत आहे.

## नाशिक जिल्ह्यातील १५ जागांसाठी १९६ उमेदवार इच्छूक उमेदवार रिंगणात

नाशिक : महाराष्ट्राच्या विधानसभेचे बिगुल वाजले आहे. यंदा निवडणूक लढवून आमदार बनण्याची तयारी अनेक इच्छुकांनी केली होती. यामध्ये माघारीच्या दिवशी अनेक नाट्यमय घडामोडीनंतर अनेक बलाढ्य उमेदवारांनी तर कुठे प्रादेशिक पक्षाच्या उमेदवारांनी पक्षादेशाचा दाखला देत आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतले आहे. माघारीच्या अखेरच्या क्षणापर्यंत १४१ इच्छुकांनी निवडणूक रिंगणातून माघार घेतल्याने नाशिक जिल्ह्यातील १५ विधानसभा क्षेत्रामध्ये १९६ इच्छुक उमेदवार आपले नशीब आजमावणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. यंदाच्या विधानसभेची रणधुमाळी अनेक आरोप प्रत्यारोपांनी गाजणार आहे. त्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँगेसचे दोन वेगवेगळे पक्ष तयार झाल्याने यंदाच्या निवडणुकीमध्ये कोण बाजी मारणार याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. तसेच, महायुतीला मदत करण्याच्या दृष्टिकोनातून मनसेच्या अनेक उमेदवारांनी या निवडणुकीतून माघार घेतल्याचे चित्र आहे. त्यामुळे महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांची लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामध्ये छत्रपती संभाजी राजेंच्या स्वराज्य पक्षाने देखील अनेक ठिकाणी उमेदवार उभे केल्याने त्यांनाही या निवडणुकीमध्ये किती यश मिळणार याकडे राजकीय क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

नाशिकमध्ये देखील राजकीय घडामोडी घडू लागल्या आहे. नाशिक जिल्ह्यातील १५ जागांसाठी ३३७ इच्छुक उमेदवारांनी विधानसभा निवडणुकीसाठी नामांकन दाखल केले होते. सोमवार दि. ४ रोजी माघारीच्या अंतिम दिवशी यातील १४१ उमेदवारांनी माघार घेतल्याने नाशिक जिल्ह्यातील १५ जागांसाठी १९६ उमेदवार आपले नशीब आजमावण्यासाठी सज्ज झाले आहे

## षडयंत्र करून माझी उमेदवारी रद्द करण्यात आली; राजेश लाटकरांचा शाहू महाराजांसमोर थेट आरोप

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळून सुद्धा अवघ्या काही तासांमध्ये उमेदवारीच काँग्रेसकडून रद्द करण्यात आल्याने अत्यंत नाराज झालेल्या राजेश लाटकर यांच्या भेटीसाठी आज (३ नोव्हेंबर) काँग्रेस खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, कोल्हापूर उत्तरच्या उमेदवार मधुरिमाराजे छत्रपती, माजी आमदार मालोजीराजे थेट निवासस्थानी पोहोचले. राजेश लाटकर यांची नाराजी दूर करण्यासाठी छत्रपती कुटुंबीय निवासस्थानी पोहोचले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील सुद्धा उपस्थित होते.

षड्यंत्र रचून माझी उमेदवारी रद्द

यावेळी राजेश लाटकर यांचे समजूत काढण्याचा प्रयत्न छत्रपती घराण्याकडून करण्यात आला. यावेळी बोलताना राजेश लाटकर यांनी षड्यंत्र रचून माझी उमेदवारी रद्द करण्यात आल्याचा थेट आरोप केला. राजेश लाटकर यांची उमेदवारी अवघ्या काही तासांमध्ये रद्द करण्यात आल्यानंतर माघार न घेता त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उमेदवारी अर्ज माघारीसाठी चार नोव्हेंबर रोजी अंतिम मुदत आहे. त्यामुळे मनधरणीसाठी आता थेट छत्रपती कुटुंबीय पोहोचल्याने राजेश लाटकर आपली उमेदवारी मागे घेणार का याकडे लक्ष असेल. दरम्यान, राजेश लाटकर यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये सुद्धा त्यांचा प्रभाग असलेल्या कदमवाडी, सदर बाजार परिसरातून शाहू महाराजांना मताधिक्य दिले होते. त्यामुळे राजेश लाटकर यांची मोठी व्होट बँक त्या भागामध्ये असल्याने काँग्रेसकडून त्यांच्या मनधरणीचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, काल (३ ऑक्टोबर) शाहू महाराज यांनी सांगितले की, एका घराण्यातील व्यक्ती राजकारणात असेल तर पुष्कळ झालं, त्या दृष्टीने आमची हालचाली आणि वाटचाल सुरू होती. जनतेचं हित लक्षात घेऊनच आमची वाटचाल सुरू होती. पण जनतेचा रेटा होता. त्यामुळे आम्हाला मधुरीमाराजे छत्रपती यांना निवडणुकीला उतरावे लागले. दरम्यान, आमदार जयश्री जाधव यांच्याबाबत बोलताना ते म्हणाले की, जयश्री जाधव ह्या या ठिकाणी आल्या होत्या, पक्षाच्या वरिष्ठांची देखील त्यांचे बोलणे झाले असेल. त्या विद्यमान आमदार होत्या त्यामुळे त्यांचे तिकीट नाकारला असेल तर त्या नाराज असणार त्यात शंका नाही.

राज्यात किती जागा येणार हे सांगण्यास मी काय ज्योतिषी नाही. त्यामुळे किती जागा येणार याबद्दल मी सांगू शकत नाही. पण सगळं चांगलं होईल यात काय प्रश्न नाही, असेही ते म्हणाले. महाराष्ट्राच्या निवडणुकीचा प्रचार शुभारंभ हा कोल्हापुरातून होतो, त्यामुळेच आपल्या जिल्ह्याचे महत्व महाराष्ट्राला कळालं असल्याचे शाहू महाराज यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक ओतारी रेखाबाई काशिनाथ व प्रकाशक सागर काशिनाथ ओतारी यांनी मुद्रक श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स पी-३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगांव-४२५००१ येथे शॉप नं.ई/१२ चौथा मजला गोलाणी मार्केट, ४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. ◆ **मुख्य संपादक : सागर काशिनाथ ओतारी** ◆ **संपादक: नंदलाल मराठे** (९१७५९९६२३२) संपादकीय जबाबदारी यांची राहील.
Email- dainikshauryamarathi@gmail.com या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख या मधून झालेल्या मतांशी संपादक /सहमत असतीलच असे नाही (RNI-MAHMAR/2023/89125)





## कारच्या डिक्कीतील दोन गोण्यांमध्ये लपविलेली ७० लाखांची रोकड जप्त

### मध्य प्रदेशातून येणारी कार सांगवी शिवारात पकडली, ३ ताब्यात

शिरपूर : मध्य प्रदेशातून शिरपूरच्या दिशेने येणाऱ्या कारच्या डिक्कीत ठेवलेल्या दोन गोण्यामधून ७० लाखाची रोकड पकडण्यात पथकाला यश आले. ही घटना सोमवारी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास शिरपूर तालुक्यातील सांगवी शिवारात घडली. याप्रकरणी चालकासह तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

मध्य प्रदेशातील सेंधवा येथून एमपी ०९ डीएल ८६१८ क्रमांकाची कार येत असून त्यात काही संशयास्पद असल्याची गोपनीय माहिती सांगवी पोलिस ठाण्याचे निरीक्षक जयपाल हिरे यांना मिळाली. माहिती मिळताच सापळा लावण्यात आला. कार येताच तिला थांबण्याचा इशारा दिला असता कारचालकाने सुसाट कार पळविली. संशय बळावल्याने पोलिसांनी कारचा पाठलाग करत सांगवी शिवारात कार पकडली. कारमधील चालकासह तिघांना ताब्यात घेण्यात आले. कारमध्ये काय आहे याची विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याने कार तपासण्यात आली. कारच्या डिक्कीमध्ये दोन गोण्या होत्या. एका गोणीत ५०० रुपयांच्या नोटा असे एकूण ६५ लाख रुपये तर दुसऱ्या गोणीत १०० रुपयांच्या नोटा असे एकूण ५ लाख असे एकत्रित ७० लाखाची रोकड हस्तगत करण्यात आली.

निवडणूक भरारी पथक, वन विभाग पथक यांच्या समवेत सांगवी पोलिसांनी पंचनामा केला.

## दोन ठिकाणी एकाचवेळी हातसफाई, चोरटे पसार म्हसदी शिवारातून सात लाखांचा ऐवज लंपास

म्हसदी : येथील भर वस्तीत असलेल्या दोन बंद घरांची कुलपे तोडून अडीच लाखांच्या रोख रकमेसह सहा ते सात लाखाचा ऐवज चोरीस गेल्याची घटना रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली आहे.

साक्री तालुक्यातील म्हसदी येथील बसस्थानकाजवळ सेवानिवृत्त मुख्याध्यापक भटू वाणी यांचे निवासस्थान आहे. त्यांनी नव्या घरात स्थलांतर केल्यामुळे जुन्या घरी काही साहित्य असल्याने या घराला कुलूप होते. चोरट्यांनी घर बंद असल्याचे लक्षात घेऊन रविवारी पहाटेच्या सुमारास घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यावेळी चोरट्यांनी घरात असलेल्या गोदरेज कपाटींचे लॉकर तोडून कपाटातून साड्या, घड्याळ, दहा हजाराची रोख रक्कम व इतर साहित्य लंपास केले आहे. चोरट्याने वाणी यांच्या घरातून तीस हजाराच्या जवळपास मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. सकाळी वाणी हे घराकडे आल्यावर ही घटना लक्षात कपाट फोडून अस्ताव्यस्त केलेला संसारोपयोगी साहित्य. आली. वाणी यांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

तर दुसऱ्या घटनेत छत्रपती शिवाजी हायस्कूलचे कर्मचारी अनंत गोविंदराव ठाकरे हे दिवाळीच्या निमित्ताने आखाडे येथे गावी गेले होते. घर बंद असल्याचे लक्षात घेऊन चोरट्यांनी रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास ठाकरे यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील गोदरेज कपाटसह धान्याच्या कोठ्या तोडून अडीच लाख रोख रक्कमेसह सात लाखांच्या ऐवज चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. सोमवारी सकाळी घर मालक अनंत ठाकरे घरी आल्यावर ही घटना उघडकीस आली. याबाबत साक्री पोलिसात ठाकरे यांनी तक्रार दाखल केली आहे.

या दोन्ही घटनांमुळे गावात संताप व्यक्त होत आहे. गेल्या दोन वलवाडीत दहा हजारांची घरफोडी शहरानजीक वलवाडी शिवारातील नामदेव बापू पाटील नगरात विजयकुमार रमेश पवार (वय ६५) यांचे मालकीचे नामदेव बापू पाटील नगरातील घर आहे. त्यांचे घर बंद असल्याची संधी चोरट्याने साधली. बंद घर फोडून चोरट्याने आतमध्ये प्रवेश केला. घरामधील पूजेच्या वस्तू, तांब्याची घागर व डेग आणि घंगाळ, पितळ्याचे तीन बादली दोन समई, पूजेचे ताटवाटी, चांदीची लक्ष्मी, श्री यंत्र, स्वामी मूर्ती असे एकूण ९ हजार ५०० रुपये किमतीचे साहित्य लंपास केले. ही घटना १२ ते २० ऑक्टोबर दरम्यान घडली आहे.महिन्यापूर्वीच गावातील निवृत्त शिक्षकाच्या घरी चोरट्याने लाखो रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना ताजी असतानाच चोरीच्या या दोन घटना घडल्यामुळे पोलिसांबाबत नाराजी व्यक्त होत आहे. या घटनांमुळे ग्रामस्थांनी पोलिसांनी रात्रीची गस्त घालावी अशी मागणी होत आहे.

## दोन पंचवार्षिक निवडणुकीत मतदारांनी केला नोटाचा वापर

**जिल्ह्यात १ हजार ७५६ केंद्रांवर मतदार करतील मतदान**

धुळे जिल्ह्यात पाचही विधानसभा मतदारसंघात एकूण १ हजार ७५६ मतदान केंद्रावर मतदान करण्यात येणार आहे. यापैकी शहरी भागात ४७८ तर ग्रामीण भागात एक हजार २७५ मतदान केंद्र राहणार आहे.

साक्री विधानसभा मतदारसंघात ४०२ मतदान केंद्र आहेत. तर धुळे ग्रामीण ३८८, धुळे शहर २८८, शिंदखेडा ३३८ तर शिरपूर तालुक्यात ३३६ मतदान केंद्र आहेत. या सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी अवश्य त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्यची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील एकूण मतदारांमध्ये ९ लाख ३१ हजार ३४१ पुरुष, ८ लाख ८७ हजार ७४४ महिला, तर ५० तृतीयपंथी मतदार असे एकूण

१८ लाख १९ हजार १३५ मतदार आहेत. यामध्ये १८ ते १९ वर्षे वयोगटातील एकूण ४१ हजार ५२६ मतदार आहेत. २० ते २९ या वयोगटातील एकूण ३ लाख ७८ हजार ८११ मतदार, ३० ते ३९ या वयोगटातील एकूण ३ लाख ९४ हजार ४६४ मतदार आहेत.

४० ते ४९ या वयोगटातील एकूण ४ लाख ५ हजार ६०५ मतदार तर ५० ते ५९ या वयोगटातील एकूण २ लाख ७७ हजार ४५६ मतदार आहेत.

## कर्मचाऱ्यांना ईव्हीएमचे प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण

शिरपूर : जिल्ह्यात पाचही मतदारांनी आपल्या मौल्यवान मतदानाचा हक्क बजावून कोणीही मतदानापासून वंचित राहणार नाही, याबाबत काळजी घेऊन निवडणूक प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. शरद मंडलिक व सहाय्य निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार महेंद्र माळी यांनी केले.

प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. शिबिरास सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार महेंद्र माळी,

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नपा मुख्याधिकारी प्रशांत सरोदे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बीडीओ एस.एस. शेवाळे, गटशिक्षणाधिकारी गणेश सुरवाडकर आदि अधिकाऱ्यांसोबत मतदान केंद्रावर नियुक्त सर्व कर्मचारी व अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मतदान केंद्रावर आपले नाव शोधण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी.एल.ओ.) व सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलिस अधिकारी, कर्मचारी यांची नेमणूक केली आहे.



## दिवाळीचा मुहूर्तही कापूस खरेदीविना, शेतकऱ्यांना प्रतीक्षा, खरेदी केंद्र सुरू केले नसल्याने भाव पडण्याची भीती

नांदेड – केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत 'एनसीसीएफ'च्या वतीने कापसाची खरेदी करण्यासाठी जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये सहा कापूस खरेदी केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. परंतु दसऱ्याचा मुहूर्त गेल्याने दिवाळीच्या मुहूर्तावर तरी कापसाची खरेदी सुरू होईल, असे वाटत असताना दिवाळीलाही पांढऱ्या सोन्याची खरेदी झालीच नाही. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अजूनही प्रतीक्षा करावी लागत आहे. केंद्र शासनाने या हंगामासाठी सर्वच खरीप पिकांचे हमीभाव जाहीर केले आहेत. त्यात कापसाला प्रतिक्विंटल ७१२१ ते ७५२१ याप्रमाणे भाव जाहीर केला आहे. जिल्ह्यात हमीभावाने कापूस खरेदीसाठी भोकर, धर्माबाद, हदगाव, कुंटूर, नांदेड व नायगाव ही सहा केंद्र सुरू केली आहेत.

परंतु दसऱ्यानंतर दिवाळीचा सण गेला तरी अद्यापही कापसाची हमीभावाने खरेदी केलेली नाही; पण अनेक ठिकाणी खासगी व्यापाऱ्यांनी कापसाची खरेदी सुरू केली आहे.

## शेंदुर्णीत आज लोकप्रिय आमदार तरुणांचे आयडल रोहितदादा पवार यांची जाहीर सभा

जामनेर (प्रतिनिधी) विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दिलीप बळीराम खोडपे यांच्या प्रचारार्थ कर्जत जामखेडचे लोकप्रिय आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे युवा नेते रोहित दादा पवार यांची जाहीर सभा शेंदुर्णी येथे दिनांक ५ नोव्हेंबर २०२४ वार मंगळवार रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर



असणाऱ्या नामदेव नगर येथे आयोजित करण्यात आलेली आहे तरी या सभेला हजारोच्या संख्येने मतदारांनी आपली उपस्थिती द्यावी असे आवाहन महाविकास आघाडीच्या नेते व कार्यकर्ते यांच्याकडून करण्यात आले आहे.

## मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघांसाठी सर्वसाधारण, पोलीस आणि खर्च निवडणूक निरीक्षक नियुक्त

मुंबई : मा.भारत निवडणूक आयोगामार्फत मुंबई शहर जिल्ह्यातील दहा मतदारसंघांसाठी सर्वसाधारण, पोलीस आणि खर्च निरीक्षक नियुक्त करण्यात आले असून हे सर्व निवडणूक निरीक्षक जिल्ह्यात दाखल झाले आहेत.

मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघांसाठी पाच सर्वसाधारण, दोन खर्च आणि एक पोलिस निवडणूक निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. धारावी व सायन कोळीवाडा या मतदार संघासाठी सत्यप्रकाश टी. एल. (भा.प्र.से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ८५९१६९६४०२ आणि ई-मेल आयडी dharavisionkoliwadagenobservergmail.com हा आहे. त्यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे. वडाळा व माहिम या मतदार संघासाठी हिमांशू गुप्ता (भा.प्र.से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ८९२८७९३६०१ आणि ई-मेल आयडी wadalamahim genobservergmail.com हा आहे. त्यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे. वरळी व शिवडी या मतदार संघासाठी समीर वर्मा (भा.प्र.से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ८५९१३८१८३२ आणि ई-मेल आयडी worlishivadigenobservergmail.com हा आहे. नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे.

भायखळा व मलबार हिल या मतदार संघासाठी अंजना एम.(भा.प्र.से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ९१३७३७२५४३ आणि ई-मेल आयडी byculla malabarhill genobservergmail.com हा आहे. त्यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असणार आहे. मुंबादेवी व कुलाबा या मतदार संघासाठी शिल्पा शिंदे (भा.प्र.से.) यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई असून संपर्क क्रमांक ९१३७३७८१८३ आणि ई-मेल आयडी mumbadevicolaba genobservergmail.com हा आहे. यांची नागरिकांना भेटण्याची वेळ सकाळी ११ ते १२ असणार वाजेपर्यंत आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघांसाठी केंद्रीय निवडणूक पोलीस निरीक्षक पोनुगुंतला रामजी (भा.पो.से.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यांना भेटण्याचे ठिकाण एलवीन गेस्ट हाऊस, हेन्री रोड, अपोलो बंदर, मुंबई असून संपर्क क्रमांक ८५९१७४३२६८ आणि ई-मेल आयडी observerpolicemumbaicitygmail.com हा आहे. नागरिकांनी भेटण्याची वेळ दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत असणार आहे.

## रावेर विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात ९ उमेदवार तर १४ उमेदवारांची माघारी

### तर कुणाची अपक्ष उमेदवारी प्रस्थापितासाठी डोकी दुःखी ठरणार...

रावेर- ता.रावेर. रावेर विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर २०२४ ला होणाऱ्या निवडणुकीसाठी आज माघारीची दुपारी तीन वाजता मुदत संपली. एकूण १४ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज माघार घेतले. तर ९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. माघारीनंतर रिंगणात असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी व चिन्हाचे वाटप निवडणूक निर्णय अधिकारी बबनराव काकडे यांनी जाहीर केले. यावेळी खर्च निरीक्षक तहसीलदार बी ए कापसे, यावल तहसीलदार मोहनमाला नाझिरकर उपस्थित होते. विशेष महत्वाची बाब म्हणजे काँग्रेसचे जळगाव जिल्हा उपाध्यक्ष तथा रावेरचे माजी नगराध्यक्ष दारा मोहम्मद यांनी आपली अपक्ष उमेदवारी कायम ठेवली आहे तर मागच्या पंचवार्षिक विधानसभा निवडणुकीत तब्बल पंचेचाळीस हजार मते घेणारे अपक्ष उमेदवार अनिल चौधरी यावेळी प्रहार




कडून उमेदवारी करीत आहेत.

अंतिम उमेदवारांची यादी यावेळी जाहीर करण्यात आली. तसेच चिन्हाचे वाटप उमेदवारांच्या व त्यांच्या प्रतिनिधिच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आले. निवडणूक रिंगणात असलेले उमेदवार पुढीलप्रमाणे :-धनंजय शिरीष चौधरी ( काँग्रेस हाताचा पंजा), अमोल हरिभाऊ जावळे (भाजप कमळ), दारा मोहम्मद जाफर मोहम्मद (अपक्ष रिक्षा), अनिल छबीलदास चौधरी (प्रहार जनशक्ती बॅट), नारायण हिरामण अडकमोल (बसपा हत्ती), आलीफ खालीफ शेख (अपक्ष रोडलोलर), मुस्ताक कमाल मुल्ला (अपक्ष किटली), शमीभा भानुदास पाटील (वंचित बहुजन आघाडीगॅस सिलेंडर) खाल्लोबाई युनूस तडवी (ऑल इंडिया हिंदुस्थान पार्टी टीव्ही). तर शेवटच्या दिवशी रावेर विधानसभा निवडणुकीतून माघार घेणाऱ्यां उमेदवारांमध्ये सुरेश गुलाब बोदडे, उमा विठ्ठल भिल, संजय अर्जुन चौधरी, नूरा तडवी, धीरज अनिल चौधरी, नंदिनी अनिल चौधरी, अबाज फकिरा तडवी, वामनराव भालचंद्र जाडे, गंगाराम महेंद्र बान्हे, दिवाकर वाणी, शोहिखान मुस्तफा शेख तवी, शेखर शेख , संजय हमीद तडवी हर्षा अनिल चौधरी हे माघारी उमेदवारांची यादी असुन मैदानातील अपक्ष उमेदवारी प्रस्थापितासाठी डोकेदुखी ठरू शकते तर कुणासाठी दिवाळीची भेट ही अत्यंत चुरशीच्या लढतीतून ठरणार आहे.



## उत्तर कोल्हापूरातून पंजा गायब

### शेवटच्या १० मिनिटात काँग्रेसच्या राजेंची माघार

### बंडखोर राजेश लाटकर यांना मविआ पाठींबा-पटोले

कोल्हापूर-कोल्हापूर उत्तर मतदार संघातून काँग्रेस गायब झाली आहे. शेवटच्या १० मिनिटात नाट्यमय घडामोडी झाल्या. काँग्रेस राजेश लाटकर यांना उमेदवारी घोषित केली. परंतु त्यांचा ए.बी.फॉर्म परत होते. छत्रपती शाहू महाराजांच्या मनोरमा राजे यांनी फार्म भरला आणि मागे घेतला. राजेश लाटकर अपक्ष ठरले. आपली उमेदवारी शाहू महाराजांनी कापली असा आरोप लाटकर यांनी त्यांया समक्ष केला. कोल्हापूरातून काँग्रेस गायब झाल्याचे सांगत फडणवीसांनी आनंद व्यक्त केला. वैयक्तीक अडचणीतून माघार घेतल्याचे छत्रपती शाहू यांनी सांगितले. आता प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणतात, राजेश लाटकर यांना आम्ही पाठींबा देत आहोत. ते महायुतीचे उमेदवार असतील.

दरम्यान काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी झाल्याप्रकाराबद्दल संताप व्यक्त केला. ताकद नव्हती तर तिकीट घ्यायचे नव्हते. आपण ताकद दाखवली असतील.

## एरंडोलला गुरु हनुमान कुस्तीगीर संस्थेच्या खेळाडूंची राज्य स्तरावर निवड

एरंडोल (प्रतिनिधी)- जळगाव जिल्हा स्तरीय कुस्ती चाचणी सामने आणि शालेय कुस्ती स्पर्धेत गुरु हनुमान कुस्तीगीर संस्थेचे खेळाडूंची राज्य स्तरावर विभागीय स्पर्धेत निवड झाल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे. ४४ की. वजन गटात, ग्रीको रोमन ४८ की. वजन गटात, ग्रीको रोमन ४६ कि. वजन गटात, फ्रीस्टाईल ५९ कि. वजन गटात फ्रीस्टाईल राम राजेंद्र पाटील, पियुष अनिल मराठे, यामिनी भानुदास आरखे, प्रेरणा अनिल मराठे यांची निवड करण्यात आली आहे. सर्व खेळाडूंची राज्य स्तरावर नेवासा जि. अहिल्यापूर येथे होणाऱ्या कुस्ती स्पर्धेसाठी दि. ६ ते ८ नोहेंबर, दि. ८ ते १० नोहेंबर लोणीदेवकर ता. इंदापूर आणि भगूर ता.जि. नाशिक या ठिकाणी १५ वर्षाखालील ग्रीकोरोमान राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धे साठी निवड झाली. सर्व खेळाडू जिजामाता माध्यमिक विद्यालय आणि एरंडोल महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. मार्गदर्शक कुस्तीको च भान् दास आरखे, वस्ताद अनिल मराठे, कु. योगेश्वरी मराठे, दिलीप सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंचे अभिनंदन ॲड. किशोर काळकर, संजय रमेश काबरा, सुनील देशमुख, प्रा. मनोज पाटील, बबलू पहेलवान, आनंद दाभाडे, गुरु हनुमान कुस्तीगीर संस्थेचे उपाध्यक्ष पंकज पाटील, खजिनदार ऋषिकेश महाजन, दुर्गादास वानखेडे, दिलीप पाटील, अनिल आरखे, अनिल भोई, संजय कुंभार, जावेद खाटीक, संभाजी देसले, अनिल अजबसिंग पाटील, राजू साळी, नगराज पवार, नरेंद्र दादा निकम, पिंटू पाटील, स्वप्नील बोरसे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# १६ एरंडोल विधानसभा निवडणूक संघात १३ उमेदवार रिंगणात तर ७ उमेदवारांची माघार...!

एरंडोल ( प्रतिनिधी )

एरंडोल विधानसभा निवडणुकीसाठी माघारीच्या अंतिम दिवशी ४ नोव्हेंबर २०२४ रोजी ७ उमेदवारांनी माघार घेतली असून १३ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात ३ उमेदवार राजकीय पक्षांचे असून अपक्ष उमेदवारांची संख्या १० आहे.यावेळी निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात आले.अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मनिषकुमार गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी संपूर्ण कामकाजात एरंडोल तहसीलदार प्रदीप पाटील, पारोळा तहसीलदार उल्हास देवरे, मुख्याधिकारी अमोल बागुल व निवडणूक नायब तहसीलदार एन.टी.भालेराव यांनी सहाय्य केले.

विशेष म्हणजे चार राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी बंडखोरी करीत आपली उमेदवारी कायम ठेवली आहे.तर शिवसेना उबाठा गटाचे नानाभाऊ महाजन आमदार चिमणराव पाटील व काही अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली आहे.

त्यामुळे आता निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## चोपडा विधानसभा मतदारसंघातून डॉ. चंद्रकांत बारेला व माजी आमदार जगदीश वळवी यांचा उमेदवारी अर्ज मागे

# दोन्ही सोनवणेंमध्ये सरळ लढत

**चोपडा(प्रतिनिधी)- आज दि. ४ रोजी माघारीच्या दिवशी चोपडा विधानसभा मतदारसंघातून डॉक्टर चंद्रकांत बारेला व माजी आमदार जगदीश वळवी यांचा उमेदवारी अर्ज माघारी झाल्याने आता दोन उमेदवारांमध्ये सरळ सरळ लढत होणार आहे.**



जगदीश वळवी | डॉ.चंद्रकांत बारेला

चोपडा विधानसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाच्या वतीने प्रा.चंद्रकांत सोनवणे यांना उमेदवारी मिळाली असून शिवसेना-उबाठाच्या वतीने जळगाव तालुक्यातील मोहाडी येथील भाजप नेते तथा माजी जि.प.सभापती प्रभाकर गोटू सोनवणे यांना अधिकृत उमेदवारी मिळाली आहे.उबाठाने या अगोदर चोपडा तालुक्यातील मोहरद येथील राजू तडवी यांना उमेदवारी जाहीर केली होती परंतु पक्षाने फॉर्म भरण्याच्या अंतिम वेळेस राजू तडवी यांच्या उमेदवारीचे एबी फॉर्म माघारी बोलावल्याने त्यांच्या ऐवजी प्रभाकर गोटू सोनवणे यांना अधिकृत एबी फॉर्म देऊन उमेदवारी दिली आहे.

या मतदारसंघात माजी आमदार जगदीश वळवी आणि डॉ. चंद्रकांत बारेला यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली होती.

दरम्यान, आज अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी डॉ. चंद्रकांत बारेला व जगदीशचंद्र वळवी यांनी आपापले उमेदवारी अर्ज मागे घेतले असल्याने आता मैदानात प्रा.चंद्रकांत सोनवणे व प्रभाकर सोनवणे यांच्यात सरळ लढत होणार आहे. अपक्ष तसेच अन्य लहान पक्षांचे उमेदवार रिंगणात असले तरी देखील दिग्गज मध्ये स्थानिक उमेदवार नसल्याने दोन्ही जळगावकरांमध्ये ही लढत रंगणार आहे एवढे मात्र खरे!

सरळ लढत



माजी आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे | प्रभाकर गोटु सोनवणे

## जळगाव शहराचा विकास व कोळी समाजाला न्याय मिळावा यासाठी माझी उमेदवारी- डॉ. आश्विन सोनवणे

जळगाव(प्रतिनिधी)- जिल्ह्यासह महाराष्ट्रात भाजपाने कुठेही कोळी समाजाला उमेदवारी दिली नाही. गेली तीस वर्ष मी भाजपमध्ये प्रामाणिकपणे पक्षाचे कार्य करीत आहे. निवडणुकीच्या तोंडावर आमदार काँग्रेसमध्ये जातात आणि तरी देखील त्यांना भाजपाकडून तिकीट दिले जाते व माझ्यासारख्या प्रामाणिक कार्यकर्त्याला डावलले जाते याची खंत त्यांनी व्यक्त करत जळगाव शहराच्या विकास व कोळी समाजाला न्याय मिळावा यासाठी माझी उमेदवारी असल्याचे त्यांनी दैनिक शौर्य मराठीला सांगितले. विधानसभा निवडणुकीचे उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी राजकीय घडामोडींना वेग आला असतांना जळगाव मध्ये जळगाव शहर विधानसभा मतदार संघात भाजपातून बंडखोरी करीत माजी उपमहापौर डॉ. अश्विन सोनवणे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. जळगाव शहर मतदार संघातून महायुतीने भाजपाचे विद्यमान आमदार सुरेश भोळे(राजुमामा) यांना अधिकृत उमेदवारी दिली असून भाजपाचे अश्विन सोनवणे यांनी बंड करत आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे.जळगाव विधानसभा निवडणुकीत भाजपाकडून संधी मिळण्याची आशा संपुष्टात



आल्यानंतर पक्षाशी बंडखोरी केलेले उमेदवारांना शांत करण्याचे पक्षश्रेष्ठींचे प्रयत्न फोल ठरल्याचं दिसत आहे. आता डॉ.अश्विन सोनवणे अपक्ष म्हणून निवडणुकीच्या मैदानात उतरले असून त्यांना काचेचा प्याला (ग्लास) ही निशाणी निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे. काचेच्या प्याला जसा पारदर्शी असतो तसे माझे या जळगाव शहरासाठी काम असणार आहे उपमहापौर असताना मी अनेक विकास कामे केली मी एक डॉक्टर असून सुशिक्षित उमेदवार आहे. पक्षाच्या वरिष्ठांनी माझ्या उमेदवारी अर्ज माघारी साठी प्रयत्न केले मात्र मी जळगाव शहराच्या विकासासाठी उमेदवारी अर्ज कायम ठेवला असल्याचे यावेळी अपक्ष उमेदवार डॉ.अश्विन सोनवणे यांनी सांगितले.

## अनिल पाटील पुन्हा मंत्रीपदावर विराजमान होतील जनतेच्या मनातील भूमिपुत्र आमदार म्हणून त्यांची ओळख : मुक्तार खाटीक

अमळनेर (प्रतिनिधी)-महायुतीचे उमेदवार अनिल पाटील हे सर्वसामान्य जनतेच्या मनातील भूमिपुत्र आमदार म्हणून ओळखले जातात ते पुन्हा मंत्री पदावर विराजमान होतील असा आशावाद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित दादा पवार गटाचे शहराध्यक्ष मुक्तार खाटीक यांनी प्रचारादरम्यान व्यक्त केला. महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर पर्यंत असल्याने सर्व विद्यमान आमदार आणि मंत्री तोपर्यंत पदावर कायम आहेत.आणि २३ नोव्हेंबर नंतर देखील जनतेच्या आशीर्वादाने महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन होऊन अमळनेर येथे फक्त अनिल पाटीलच पुन्हा सन्मानाने आमदार होतील, असा दावा राष्ट्रवादी



अजित पवार पक्षाचे शहराध्यक्ष मुक्तार खाटीक यांनी केला आहे. अमळनेर मतदारसंघाची जनता यावेळी जाती धर्माच्या नावावर मतदान करणार नसुन विकास हा एकमेव मुद्दा मतदानासाठी प्रत्येकाच्या मनामनात असणार आहे. याशिवाय शहरात गुंडगीरी संपुष्टात आणण्यात अनिल दादा यांना यश आल्याने नागरिक व्यापारी बांधव सुरक्षित झाले असून विशेष करून महिला भगिनींच्या मनातही सुरक्षेची भावना निर्माण झाली आहे.त्यामुळे अनिल दादाच योग्य उमेदवार असल्याचे प्रत्येकाचे मत झाले आहे. गेल्या दोन निवडणूकित ज्यांनी जातीचे कार्ड वापरून या पवित्र भूमित विष पेरण्याचे काम केले त्यांना एकदा घरी पाठवल्यानंतर जातीपातीचे राजकारण या तालुक्यात संपुष्टात आले असून अनिल दादांनी गेल्या पाच सर्वच जाती धर्माच्या लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याने सारे जण आता त्यांना मनापासून जुळले आहेत.

यामुळे सर्वांच्या ताकदीने ते पुन्हा एकदा मोठ्या मताधिक्याने आमदार होतील असा विश्वास मुक्तार खाटीक यांनी व्यक्त केला आहे.

# जनता बोले परिवर्तन!

## अमळनेर मतदारसंघात डॉ.अनिल शिंदे यांच्या माध्यमातून परिवर्तनाची लाट



***अमळनेर (प्रतिनिधी)-जनता बोले परिवर्तन... हे ब्रीद वाक्य घेत अमळनेर विधानसभा मतदारसंघात डॉ.अनिल शिंदे यांच्या माध्यमातून परिवर्तनाची लाट निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.***

निवडणूक प्रचारात महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.अनिल नथ्थु शिंदे हे आपल्या समर्थकांसोबत एक अत्यंत प्रभावी प्रचार दौरा करीत आहेत.या दौऱ्यात,त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांवर, बेरोजगारीच्या समस्यावर आणि हमीभावाच्या अभावाबद्दल चर्चा केली. त्यांनी शिरूड, कावपिंप्री, इंदापिंप्री, सुमठाणे, इंधवे, जिराळी आणि पिंपळकोठा गावांमध्ये मतदारांशी संवाद साधला.यावेळी महाविकास आघाडीचे सर्व नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी त्यांनी स्पष्ट केले की,महाविकास आघाडी सरकारच्या स्थापनेनंतर शेतकऱ्यांना हमीभाव मिळेल आणि त्यांच्यावर अन्याय होणार नाही. यावेळी डॉ. शिंदे यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या दयनीय परिस्थिती, बेरोजगारीच्या प्रश्नांवर चर्चा केली. या संदर्भात, त्यांनी मतदारांना आवाहन केले की, चांगल्या मतांनी मला निवडून द्या आणि सेवेची संधी द्या. हे शब्द जनतेचा उत्साह वाढवण्यात महत्त्वपूर्ण ठरले.या मतदारसंघात यंदा परिवर्तन निश्चित आहे, असा विश्वास मतदारांनी व्यक्त केला आहे. हाथ बदलेगा हालात, म्हणजेच लोकशाहीच्या माध्यमातून बदल साधला जाईल असेही ते म्हणाले. त्यांच्या या स्पष्ट वचनांमुळे, जनता त्यांना विश्वासाने स्वीकारत आहे. महाविकास आघाडीच्या या यशस्वी प्रचारामुळे, अमळनेर विधानसभा निवडणुक महत्त्वपूर्ण ठरेल आणि त्यामुळे अमळनेर मध्ये सकारात्मक बदल घडवण्याची आशा कुणीही नाकारू शकत नाही.डॉ.अनिल शिंदे यांचा आवाज सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचेल आणि महाराष्ट्राच्या भविष्यकाळात एक नवा प्रकाश आणेल असे चित्र तूर्तास अमळनेर विधानसभा मतदारसंघात दिसते.

## गिरीश महाजन यांच्या प्रचाराचा शुभारंभ शहरात नगरसेवकांनी सांभाळली धुरा!

**जामनेर(प्रतिनिधी)- भाजपचे उमेदवार ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या शहरातील प्रचाराची धुरा नगरसेवकांनी स्वीकारली असून, आपापल्या प्रभागात कार्यकर्त्यांसह प्रचाराला सुरुवात केली आहे.**



प्रचाराचा शुभारंभ रविवारी, गिरीश महाजन व माजी नगराध्यक्ष साधना महाजन यांनी बजरंगपूर भागातील दुर्गा देवी मंदिरात नारळ वाढवून केला.बजरंगपुरा येथील प्रचार रॅलीत नगरसेवक अतिश झाल्टे, जितेंद्र पाटील, दत्तात्रय सोनावणे, तेजस पाटील, जितेश पाटील, रवी बंडे, दीपक तायडे, ॲड. सितेश साठे, सनी डांगी, चंद्रकांत बाविस्कर, रवींद्र झाल्टे, राजेंद्र भोईटे, अशोक नेरकर, राजेंद्र देशपांडे, राजू महाजन, सदाशिव माळी, सुहास पाटील, नीलेश चव्हाण, राजेश नाईक आदी कार्यकर्ते उपस्थित होते.महाजन यांनी मतदारसंघातील जि. प. गटनिहाय घेतलेल्या मेळाव्यानंतर प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण झाला होता. आता उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रत्यक्ष मतदारांना घरोघरी भेट देऊन कार्यकर्ते महायुती शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती मतदारांपर्यंत पोहचवित आहेत.